

# दत्तक योजनेतून ३५० वृक्षांचे संगोपन

## पर्यावरणशास्त्र विभागाचे ग्रीन कॅम्पसला बळ : देशी झाडांचे जतन

**आशिष आडिवरेकर**
कोल्हापूर

पर्यावरण शास्त्र विभागाने वृक्ष दत्तक योजना सुरु केली आहे. यामध्ये सामाजिक संस्था या विभागाकडे रोपे देतात. त्यानंतर त्या रोपांची लागवड आणि त्यांचे संगोपन ही जबाबदारी पर्यावरणशास्त्र अधिविभागाचे विद्यार्थी घेतात. विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या आवारात सुमारे ३५० झाडे या योजनेतून लावली असून त्यांचे संगोपनही केले जात आहे. यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या वैशिष्ट्य असणाऱ्या ग्रीन कॅम्पस उपक्रमाला पाठबळ मिळाले आहे.

पर्यावरण संवर्धनासाठी विद्यापीठाने कोणत्या उपाययोजना केल्या आहेत. याचेही मुल्यमापन नॅक समितीकडून केले जाते. त्यावर विद्यापीठाला गुण दिले जातात. याला ग्रीन कॅम्पस असे म्हणतात. शिवाजी विद्यापीठाने ग्रीन कॅम्पस अंतर्गत पथदर्शी काम केले. गुण, परीक्षण याच्याही पलीकडे जाउन विद्यापीठाने परिसरातील जैवविविधता जपली आहे.

### ग्रीन कॅम्पस योजनेला हातभार..

शिवाजी विद्यापीठाच्या पर्यावरणशास्त्र विभागाच्या वतीने २००८ पासून ही योजना सुरु केली आहे. प्रत्येक वर्षी प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांच्या संख्येनुसार त्यांना झाडांची विभागणी करून दिली जाते. सुमारे ३५० हून अधिक झाडांचे दरवर्षी संगोपन केले जात आहे. विद्यापीठाचा परिसर मोठा आहे. मात्र या झाडांच्या माध्यमातून विद्यापीठाच्या ग्रीन कॅम्पस योजनेला हातभार लागला आहे.

**डॉ. आसावरी जाधव, प्रभारी विभागप्रमुख पर्यावरणशास्त्र विभाग**

पर्यावरणशास्त्र अधिविभागाचे यातील योगदान उल्लेखनीय आहे. या अधिविभागाने वृक्ष दत्तक योजना राबवली आहे. या अंतर्गत जिल्ह्यातील विविध सामाजिक संस्था, व्यक्ती यांनी विभागाकडे दिली. विद्यार्थ्यांनी त्याची लागवड करुन त्याचे संगोपन केले.

यातून या परिसरात सुमारे ३५० झाले लावून जगवली आहेत. झाडांना पाणी देणे, आळी करणे, खते देणे या कामात विद्यार्थी मदत करतात. एम. एस. सीच्या दोन्ही वर्षातील विद्यार्थ्यांना हे काम दिले आहे. बहुतांश झाडेही देशी आहेत. यामुळे ग्रीन कॅम्पस या योजनेला पाठबळ मिळाले आहे. प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना झाडांचे संगोपन करण्याचे काम दिले जाते. त्यांना वर्षाअखेरीस यावरुन १० ते २० मार्क दिले जातात. यामुळे विद्यार्थीही याकडे जाणीवपूर्वक लक्ष देतात.



### ग्रीन कॅम्पस अंतर्गत उपक्रम

- स्वयंपूर्ण रोपवाटिका
- मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड
- जलसंधारणातून जलस्वयंपूर्णता
- घनकचरा व्यवस्थापन
- सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प
- किचन वेस्टपासून गॅसनिर्मिती